Vol III Issue IX March 2014

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3 | Issue-9 | March-2014
Available online at www.aygrt.isrj.net

# “प्रल्हाद केशव अत्रे यांच्या कथांचा वाङमयीन अभ्यास”

**बाळासाहेब गार्डी**

पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र रा . ब . नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जिल्हा  अहमदनगर

***सारांश :-*** आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी आपल्या आयुष्यात ज्या अनेक गोष्टी रमतगमत केल्या त्यापैकी कथालेखन ही एक गोष्ट होय . अत्रेंना आपल्या बालपणापासून गोष्टींचा नाद लागलेला दिसून येतो . वास्तविक पाहता अत्रेंच्या उभ्या लेखनालाच कथनाचे अंग आहे . गोष्टीची बैठक आहे . अत्रेंनी कथांचे लेखन आपल्या फावल्या वेळेतच केल्याचे दिसून येते . 'जे जे ठावे ते ते नमुद करून ठेवावे' ही अत्रेंची जबरदस्त भावना आहे . अत्रेंच्या स्वभावाला उपजतच गोष्टीवेल्हाळपणाचा गळा आणि गोष्टी खुलविण्याच्या सामर्थ्याचा कान आहे . अत्रेंच्या सर्वच लेखनाचे ते अंगभूत वैशिष्टय आहे . कादंबरीप्रमाणेच कथा हा प्रकार अत्रेंना आपल्या व्यक्तिमत्वापेक्षा वेगळा वाटला नाही . अत्रेंनी करूण,विनोदी,राजकीय व रूपांतरीत इत्यादी प्रकारात अनेक कथा लिहिलेल्या आहेत .

## *प्रस्तावना :*

अत्रेंच्या सर्वच लेखनात विनोदाची पेरणी असून त्यादृष्टिने लघुकथा क्षेत्रातील त्यांचा फेरफटका देखील तितकाच लक्षणीय आहे असे म्हणावे लागते . फेरफटका म्हणण्याचे कारण त्यांच्या लघुकथांची संख्या फार थोडी आहे . या थोडया कथादेखील कथातंत्राच्या सदरात बसवणे कठीण आहे . पण त्यातील बुद्धिचापल्य, कल्पनाविलास आणि निरीक्षण त्यांच्या गुरूंची म्हणजे गडकयांची आठवण करून देते .
अत्रेंच्या कथांचे खालील प्रकारात वर्गीकरण करता येते .

**1** . कारूण्याची छटा असलेल्या कथा .
**2** . विनोदी कथा .
**3** . राजकीय कथा .
**4** . हास्य कथा .
**5** . रूपांतरीत कथा .

### 1. कारूण्याची छटा असलेल्या कथा ः

अत्रेंनी जवळ जवळ सर्वच कथांची बीजं वास्तवात आहेत . दुःख प्रकट करण्याचे सामर्थ्य अत्रेंच्या ठायी अमाप आहे . वेदना हाच हास्य आणि कारूण्य यामधील सेतू असतो . विनोदाचा विषय दुःखात असतो . त्याचा उगमच वेदनेत असतो . अत्रे मानवी जीवनातले हे कारूण्य आणि हास्य दोन्ही आपल्या कथांमधून पकडताना दिसतात . 'महापुरात बुडालेला विष्णू, समुद्राची देणगी, पाठीवरचे वळ, कुनी बोलायचं नाही' यासारख्या कथांमधून अत्रेंनी कारूण्य आळविले आहे . अर्थात हे कारूण्य प्रत्यक्ष जीवनात कुठे ना कुठे, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अत्रेंच्या प्रत्ययाला आले आहे . त्याचे स्वरूप पुर्णतः काल्पनिक नाही . बयाचशा वास्तवाला थोडेफार तिखटमीठ लावून अत्रेंनी कथांची रंगरंगोटी केली आहे .

समुद्रात बुडालेला रामदास बोटीमधल्या दुर्दैवी उतारूंवरून अत्रेंना महापुरात बुडालेल्या विष्णूची सहज आठवण झाली आणि स्वतः अकरा वर्षाचे असताना प्रत्यक्ष पाहिलेली विष्णूची ती गोष्ट त्यांनी सांगितली आहे . 'सांगतोच तुम्हाला कसे झाले ते' असे म्हणून अत्रेंनी विष्णूच्या गोष्टीला सुरवात केली आहे . चांबळीच्या ओढयाला महापूर येतो आणि या पुरात तालीमबाज विष्णू सर्वांच्या देखत वाहून जातो . या साया घटना अत्रेंनी महापुराच्या गतीनेच सांगितल्या आहेत .

'समुद्राची देणगी' या कथेतील रूबेन रेचेल यांच्या जीवनातील कारूण्य, आयझॅकची सॅराविषयीच्या मुक प्रेमातील निःशुद्ध आर्तता हृदय व्याकुळ करणारी आहे . अत्रेंनी म्हटले आहे की, 'मी स्वतः ती गोष्ट लिहिली असून, अजूनही ती वाचताना माझे डोळे अश्रूंनी डबडबून येतात . ' या कथेला अत्रेंनी ख्रिश्चन कुटुंबाची जोड दिल्याने वातावरण निर्मितीला ते खूपच पोषक ठरलेले आहे . अत्रेंची कथा आडमार्गाने विकसीत होत नाही . ती सरळ चालते आणि सरळ हृदयाला भिडते . कारूण्याच्या झळाळीने ती तेजाळून निघालेली असते आणि उत्कटतेने ती न्हाऊन राहिलेली असते . मग 'कुणी बोलायचं नाही' सारखी किंवा 'पाठीवरचे वळ' सारखी कथा असो .

**2 . विनोदी कथा ः**

'ब्रॅडीची बाटली, माझा व्यापार, जांबुवंत दंतमंजन, पुणेरी टांगेवाला, गुत्त्यातील नारद, महापुरात बुडालेला विष्णू, बारा आण्याला घोडे' इ . त्यांच्या गाजलेल्या खास विनोदी कथा त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात . या सर्व विनोदी कथांमधून जीवनातील कारूण्याला अत्रेंनी स्पर्श केला असून तीव्र उपहासाचे फटके मारीत त्यांचा विनोद बेगुमानपणे संचार करीत असलेला दिसतो . त्यांच्या विनोदाला उपरोधाचीदेखील धार आहे . कारूण्याचा वेध घेणारा त्यांचा विनोद वाचकांना क्षणभर अंतर्मुख केल्याशिवाय राहत नाही . ज्याला जीवनातील कारूण्य टिपता येते त्यालाच चांगला विनोद करता येतो . असे स्वतः अत्रेंचे मत आहे . अत्रेंच्या विनोदाचे हेच रहस्य आहे . म्हणूनच 'ब्रॅडीची बाटली' मधील ज्यंबकरावांचे अज्ञानी वागणे विनोदी वाटले तरी ढेकणे मास्तरांच्या मुलाचा जीव वाचवण्यासाठी चाललेली त्यांची उलघाल अस्वस्थ करणारी ठरते . 'कुणी बोलायचं नाही, महापुरात बुडालेला विष्णू, पाठीवरचे वळ,समुद्राची देणगी' या कथेतील कारूण्य अंतःकरणाला चटका लावणारे आहे .

अत्रेंचा विनोद हा फुटकळ, भावडा, कुत्रिम किंवा शाब्दिक कोटयात रमणारा विनोद नाही . किंवा केवळ हसण्यासाठी विनोद नाही . अत्रेंचा विनोद समाजाला दिशा दाखवणारा आहे . तो कारूण्याच्या झालरीने माखलेला आहे . अत्रेंच्या कथा या बाहयरूपी विनोदी असल्या तरी अंतरंगी मात्र कारूण्याने डबडबलेल्या आहेत . अत्रेंचा विनोद हा गडकरी, कोल्हटकरांच्या विनोदापेक्षा सुधारलेला व पुढारलेला आहे . अत्रेंना विनोदाची प्रगल्भ जाणीव आहे .

**3 . राजकीय कथा ः**

राजकीय कथा लिहिणारे अत्रे हे मराठीतील पहिलेच कथाकार होत . अत्रेंनी मराठी कथेला दिलेली ही एक अपूर्व देणगीच आहे . अत्रेंनी प्रामुख्याने या कथा संयुक्त महाराष्ट्राला विरोध करणाया राजकीय व्यक्तिंवरच लिहिलेल्या आढळतात . या कथातून प्रामुख्याने राजकीय विकृतीचा शोध घेणे आणि व्यक्तिविडंबन जाणवते . या कथांमधील विनोद हा प्रामाणिक आहे . अत्रेंनी लिहिलेल्या बहुतांश कथांना विनोदाची बैठक आहे . पण बहुतेक कथांची रचना सरळ निवेदनाची आहे . प्रसंग अगर व्यक्ती त्यानुसार तत्वसुत्र प्रमुख मानून अत्रे कथेची गुंफण करतात . मुद्दाम काही सायासाने ते काही करीत आहेत असे आढळत नाही . साधेपणाने ती अलंकृत झालेली असते . कोटयाप्रचूर कथानकप्रधानता हे तिचे प्रमुख वैशिष्टय असले तरी तंत्राबिंत्राच्या घोळात अडकलेली दिसत नाही . सामाजिक रितीरिवाज व संकेत इ मध्ये घोटाळणारी अत्रेंची कथा असली तरी त्यामुळे ती जड होत नाही . अत्रेंच्या काही कथांमधील कल्पना अगदी सामान्य आहेत पण अत्रे ती सुरस बनवताना दिसतात . प्रसंगी नाटकी,अघटीत प्रसंगांची रचना करून अत्रे कथेची घडी बिघडविण्यास मदतही करतात .

विशेषतः गंभीर कथा हाताळण्यासाठी लागणारे वृत्तीचे गांभीर्य अत्रेंच्या ठायी नाही, असे नव्हे . पण त्यासंबधीच्या जिव्हाळया अभावी विनोदाकडे कल होत असल्याने ते अधूनमधून निसटते आहे आणि कथा पसरट बनत जाते . अत्रे मग फक्त काहीतरी सांगत राहतात असे वाटते . अत्रेंसारखी त्यांची कथाही 'स्वैर' आहे . बंदिस्थ नाही . चतुराईची गुंफण किंवा कलाटणीचा विस्मय तिच्यामध्ये नाही . काहीशी काहीशी अतिशयोक्तिची डुब आहे . पण डॉ . इंदुमती शेवडेंनी म्हटल्याप्रमाणे "अत्रेंच्या विनोदाला उपरोधाची धार आहे . उपहासाची छटा त्यात असते . झोंबणारा तिखटपणा त्यात असतो . त्यांच्या कथेत जोशींच्या कथेप्रमाणे कथा असत नाही . जोशींचे कथेशिवाय भागत नाही . अत्रेंची कथा कल्पनाविलास व कोटया करीत स्वैरपणे भटकते . " विनोदी कथातून अत्रेंनी जणू जीवनातील हास्य या मुलभूत प्रवृत्तीस प्रतिष्ठीत केलेले असून जीवन सुसहय बनविण्याच्या दृष्टीने रसिकास आवाहन केलेले आहे . स्वभाव व प्रसंगनिष्ठ विनोद उचलून धरणारी अत्रेंची विनोदासह एकूणच कथा सर्वसाधारणपणे य . गो . जोशी, श्री . म . माटे यांच्या कथेशी जातकुळी सांगणारी आहे . राजकीय कथांची निर्मिती ही अत्रेंची मराठीला खास देणगी मानावी लागेल .

**4 . हास्य कथा ः**

अत्रेंच्या एकूणच लहान मोठया गोष्टींचा विचार करता हास्य आणि कारूण्य असे दोन्ही रस त्यांनी सारख्याच सामर्थ्याने आळविलेले आहेत, असे दिसते . मानवी जीवनातील कारूण्य टिपावे आणि विनोदाच्या माध्यमातून त्याचे दुःख उकलून दाखवावे . ही अत्रेंची प्रकृती आहे . विनोदाईतकाच करूण रस निर्माण करण्यात अत्रे सिद्धहस्त असल्याची आपणास प्रचीती येते .

प्रल्हाद केशव अत्रे यांनी अशाप्रकारे करूण,विनोदी,राजकीय व रूपांतरीत इत्यादी प्रकारात अनेक कथा लिहिलेल्या आहेत . या सर्वच कथा थोडयाफार फरकाने विनोदी असून जीवनावर प्रभावीपणे भाष्य करणायाही आहेत . आचार्य अत्रे यांच्या एकूणच लेखनाचे वैशिष्टय आहे की ते हसवता हसवता वाचकांना विचार करायला भाग पाडतात . थोडक्यात या कथा वरवर विनोदी वाटत असल्या तरी त्या अंतर्मख करणाया आहेत . मुळातच आपल्या जीवनात आजूबाजूला घडलेल्या घटनांचा आधार घेऊनच अत्रे कथालेखन करतात . त्यामुळे त्यांना वास्तवाचा मोठा आधार असतो . अत्रे मानवी जीवनातील कारूण्य आणि हास्य आपल्या कथांमधून मांडण्याचा यशस्वीपणे प्रयत्न करतात . उपहास आणि उपरोधाची शैली ही अत्रेंच्या कथांची महत्वाची वेशिष्टये दिसून येतात . एकूणच अत्रे वाचकांचे मनोरंजन व प्रबोधन करायला जसे लिहितात त्याचबरोबर स्वतःच्या मनाला मोकळे करण्यासाठीही लेखन करताना दिसतात .

**संदर्भ ग्रंथ ः**

1 . इंदूमती शेवडे ः मराठी कथा ः उद्‌गम आणि विकास,
2 . अ . ना . अदवंत ः मराठी कथा साहित्य ः एक आलेख, निहारा प्रकाशन,पुणे .
3 . प्र . के . अत्रे ः मोहित्यांचा शाप, परचुरे प्रकाशन , मुंबई .
4 . बाळ सामंत ः अत्रे वाङमय दर्शन, भारतीय ग्रंथभवन प्रकाशन .
5 . प्र . के . अत्रे ः विनोदगाथा,परचूरे प्रकाशन, मुंबई .



**बाळासाहेब गार्डी**
पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net